| MHKO050000312020 | संक्षिप्त दिवाणी दावा क्रमांक १८/२०२० मधील<br>नि.१६ वरील आदेश<br>विशाल यार्न विरुध्द पांडूरंग पाटील |
| --- | --- |

सदरचा अर्ज हा वादी यांनी दाखल केला असून दाव्याच्या सरनाम्यात अर्जात मागणी केलेप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी याकरीता दिवाणी न्यायप्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. सदर अर्जाद्वारे वादी यांनी असे कथन आहे की, सदर दावा दाखल करतेवेळी दाव्याच्या मथळयामध्ये स.द.के.नं. असे नमूद केलेले आहे. तसेच दाव्याच्या सरनाम्यात दावा रक्कम वसूलीचा असे नमूद केलेले आहे. दाव्याच्या मथळयामध्ये स.द.के.नं. या दाव्याच्या नंबरच्या खाली लगेचच तसेच दाव्याच्या सरनाम्यामध्ये दावा रक्कम वसूलीचा यामध्ये सि.पी.सी ऑर्डर ३७ प्रमाणे असे नमूद करण्याचे हस्तदोषामूळे व टाईपिंग दोषामूळे नमूद करण्याचे राहून गेलेले आहे. त्यामूळे सदर दूरुस्ती होवून मिळणेसाठी वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सदर दुरुस्ती केल्यामूळे वादीची केस बदलत नाही अगर दाव्यात कोणतेही बदल होत नाही. करीता सदरचा अर्ज मंजूर करावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले असून त्यांनी असे म्हटले आहे की, सदरचा अर्ज चालण्यास पात्र नाही. प्रतिवादी यांनी निशाणी १४ ला अर्ज दिल्यानंतर वादी यांनी दाव्यातील महत्वाच्या व मूलभूत त्रूटी दूर करण्याच्या उद्देशाने सदरचा अर्ज दिला आहे. सदरचा अर्ज हा मंजूर झाल्यास दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे. तरी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा असे म्हणणे मांडले.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली.

५. अभिलेखावरुन असे दिसून येत आहे की, सदरचा दावा हा संक्षिप्त दावा म्हणून वादी यांनी दाखल केला आहे. परंतू दाव्याच्या निशाणी १ मध्ये सदर दावा संक्षिप्त दावा

असल्याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ च्या तरतूदीप्रमाणे सदर दाव्यात उल्लेख नाही. तसेच सदर दावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ प्रमाणे दाखल केला असल्याचे नमूद केले नाही. नियमित दिवाणी दावा व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३७ प्रमाणे दावा यामध्ये फरक असून सदर अर्जातील नमूद दूरुस्ती करण्याची परवानगी वादीला  दिल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार आहे. कायदयाप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी देत असताना दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार नाही हे पाहणे आवश्यक असते. सदर अर्जातील नमूद मागणी पाहिल्यास तशी दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात बदल होणार आहे. त्यामूळे सदरचा अर्ज हा  दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कायदयाच्या तरतूदीत बसत असल्याचे दिसून येत नसल्याने सदरचा मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे-

## <u>आदेश</u>

१.  सदरचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
MRUNMAYEE M
CHOUDHARY
Date: 2022.10.20
11:13:29 +0530

**ठिकाण - इचलकरंजी.**
**दिनांक -  १९/१०/२०२२**

**(एम.एम.चौधरी)**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**इचलकरंजी**